महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २३६ वा | दिनांक : १५/०७/२०२५ | वार : मंगळवार

## विजयी मेळावा मराठी पुरताच होता, त्याचा राजकारणाशी संबंध नाही - राज ठाकरे



**नाशिक :** राज्यात महापालिका निवडणुकांची तयारी सुरू असताना ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. मुंबईत मराठीच्या मुद्द्यावर झालेल्या विजयी मेळाव्यानंतर उद्धव आणि राज ठाकरे तब्बल वीस वर्षांनी एका व्यासपीठावर एकत्र आले. त्यानंतर या दोघांची पालिका निवडणुकीत एकत्र येण्याची शक्यता अधिकच वाढली होती. मात्र, विजयी मेळावा मराठी पुरताच होता, त्याचा राजकारणाशी संबंध नाही, असे विधान राज ठाकरे यांनी केले आहे. त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चा पुन्हा अनिश्चिततेच्या वाटेवर गेली आहे.

सध्या नाशिकमध्ये मनसेचे तीन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आजपासून या शिबिराला सुरुवात झाली असून मनसे प्रमुख राज ठाकरे हे शिबिरासाठी इगतपुरी येथे दाखल झाले आहेत. यावेळी त्यांनी अनौपचारिक गप्पांदरम्यान विजयी मेळाव्याबाबत भूमिका स्पष्ट केली. त्यामुळे ठाकरे बंधूंच्या युतीचा सस्पेन्स आणखी वाढला आहे.

मराठीचा विजयी मेळावा केवळ मराठीच्या मुद्द्यावर होता, त्याचा राजकारणाशी संबंध नाही, असे राज ठाकरे यांनी म्हटले. तसेच नोव्हेंबर - डिसेंबर दरम्यान चित्र स्पष्ट होईल. त्यांनतर युती संदर्भातील निर्णय बघू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

हिंदी सक्तीच्या जीआरबाबत बोलताना राज ठाकरे म्हणाले की, हिंदी सक्तीच्या बाबतील आताच्या सरकारने जीआर काढला होता. मागील सरकारने त्याचा अहवाल स्वीकारला होता, पण त्याचा जीआर काढला नव्हता, अंमलबजावणी केली नव्हती.

मनसेने नेते आणि पदाधिकाऱ्यांसाठी विशेष शिबिराचे आयोजन केले असून, या शिबिराला आजपासून इगतपुरी येथे सुरुवात झाली आहे. हे शिबीर तीन दिवस चालणार असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे स्वतः तीनही दिवस इगतपुरीत मुक्कामी राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या शिबिराला महत्त्व प्राप्त झाले आहे.

दरम्यान, आत्तापर्यंत आमची निवडणूक आम्ही एकट्याने लढवली आहे, त्यामुळे आताही वेळ आली तर एकटे निवडणूक लढवू, अशी सूचक प्रतिक्रिया मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली होती. यावर उद्धव ठाकरेंनीही भाष्य केले. यासंदर्भात बोलू नये, असे आदेश त्यांच्या पक्षप्रमुखाने दिले आहेत, असे म्हणत आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागू द्या, मग बोलू, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरेंनी दिली होती.

दरम्यान, आम्ही एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठीच असे वक्तव्य खुद्द उद्धव ठाकरे यांनी केले. जे महाराष्ट्राच्या मनात आहे ते होईल असेही ते म्हणाले होते. युतीबाबत शिवसेना ठाकरे गटाने टाळी दिलेली असताना दुसरीकडे मात्र मनसे सावध पवित्रा घेत असल्याचे दिसून येत आहे. राज ठाकरेंच्या विधानानंतर ठाकरे बंधूंच्या युतीचा सस्पेन्स आता आणखी वाढला आहे.

## मी अजूनही राष्ट्रवादीचा प्रदेशाध्यक्ष : जयंत पाटलांचे स्पष्टीकरण



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या राजीनाम्याच्या आणि भाजप प्रवेशाच्या चर्चांवर अखेर मौन सोडले आहे. गेल्या दोन दिवसांपासून माध्यमांमध्ये त्यांच्या राजीनाम्याची चर्चा गाजत असताना, जयंत पाटील यांनी विधानभवनात माध्यमांशी बोलताना स्वतःची भूमिका स्पष्ट केली. भाजपमध्ये प्रवेश करण्यासाठी कुणी मला विचारलेले नाही आणि मीही कुणाला विनंती केलेली नाही. तरीही माझ्या राजीनाम्याच्या चर्चा सुरू आहेत. मी कुठे जाणार हे माध्यमांनीच ठरवून टाकले आहे, याचे मला आश्चर्य वाटते, असे जयंत पाटील म्हणाले.

जयंत पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे वृत्त दोन दिवसांपूर्वी वृत्तवाहिन्यांमध्ये झळकले होते. भाजपात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांनादेखील उधाण आले होते. त्यातच जयंत पाटील हे नाराज असून ते भाजपात प्रवेश करणार असल्याच्या वावड्याही अनेकदा उठल्या. आता जयंत पाटील माध्यमांसमोर येत या सर्व चर्चांवर स्पष्टीकरण दिले आहे.

एखादा प्रदेशाध्यक्ष असणारा माणूस, त्याच्याबाबत एवढ्या वावड्या उठणे, तो कोणत्या पक्षात जात आहे, याबाबत तुम्हीच सगळे ठरवायला लागले. मला आश्चर्य वाटते. मला आताच सहाय्यकाने बातमी पाठवली की, बातम्या चालू आहे. मलाही आश्चर्य वाटतंय. सूत्र कुठे आहेत मला दाखवा जरा. मला त्या सूत्रालाच भेटायचे आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

कुणी कुणाशी बोलले तरी त्याची बातमी होते. एखाद्या साध्या गोष्टीसाठी कुणी कुणाला भेटले तरी, आपण पराचा कावळा करतो. त्यामुळे अशी कोणतीही परिस्थिती नाही. मी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा प्रदेशाध्यक्ष आहे. मी त्या पक्षाचे काम करतो. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे आम्ही कार्यकर्ते आहोत.

भाजप पक्षात प्रवेश करण्यासाठी कुणी मला विचारलेले नाही आणि मी कुणाला तशी विनंती केलेली नाही. भाजपने माझ्याशी थेट संपर्क साधलेला नाही. भाजपमध्ये जे अनेक प्रमुख नेते आहेत त्यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. मी व्यक्तीगत वैर कुणाशी करत नाही. त्यामुळे भाजपच्या नेत्याशी बोलले, मुख्यमंत्र्यांना भेटलो की त्या पक्षात जाणार अशी चर्चा होते, असेही जयंत पाटील म्हणाले.

आपण पक्ष बदलणार असल्याच्या बातम्या नेहमीच माध्यमामधून दिल्या जातात. पण मी शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षात काम करत आहे. मी पक्ष बदलाच्या बातम्यांना कधी खोडून काढत नाही. कारण माध्यमे अशा बातम्या सारख्या देत असतात. कालांतराने या बातम्या मागे पडतात. त्यामुळे प्रत्येकवेळी बातमी आल्यानंतर त्यावर उत्तर देत बसणे मला संयुक्तिक वाटत नाही, असेही जयंत पाटील म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त 10 जून रोजी राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना संबोधित करताना जयंत पाटील यांनी शरद पवारांच्या उपस्थितीत अध्यक्षपद सोडण्याचे आणि नवीन चेहऱ्याला संधी देण्याचे संकेत दिले होते. त्यानंतर शरद पवार यांनीही जयंत पाटील यांच्या भूमिकेवर सकारात्मकता दाखवली होती. मात्र शनिवारी जयंत पाटील यांनी पदाचा राजीनामा दिल्याची चर्चा सुरु झाली. शेवटी जयंत पाटील यांनीच समोर येऊन मी प्रदेशाध्यक्षपदी अजूनही असल्याचे सांगितले.

## सामाजिक न्याय विभागात १५०० कोटींचा टेंडर घोटाळा

**मुंबई :** कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट यांच्या नेतृत्वातील सामाजिक न्याय खात्यात तब्बल १५०० कोटींचा टेंडर घोटाळा झाल्याचा आरोप आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून हे टेंडर रद्द करण्याची मागणी केली आहे. या आरोपामुळे अगोदरच व्हिडिओ कांडामुळे अडचणीत सापडलेल्या संजय शिरसाट यांचा पाय आणखी खोलात गेल्याची चर्चा आहे.

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचाही एक व्हिडिओ गत आठवड्यात व्हायरल झाला होता. त्यात ते आपल्या खोलीत कॉटवर सिगारेट ओढत बसल्याचे दिसून येत आहेत. यावेळी त्यांच्या अंगावर बनियन व चड्डीच होती. तसेच त्यांच्या शेजारी एक पैशांचे बंडल असणारी बॅगही पडलेली होती. त्यांचा हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाने हा पैसा त्यांना मिळालेल्या ५० खोक्यांपैकी १ खोका असल्याचा आरोप केला होता. या प्रकरणी आरोप - प्रत्यारोपाच्या फैरी झडत असताना आता शिरसाट यांच्या सामाजिक न्याय विभागात १५०० कोटींचा टेंडर घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार या कथित घोटाळ्याचा तपशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देत म्हणाले की, मुख्यमंत्री साहेब, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यावर आधीच अनेक गंभीर आरोप आहेत. आता टेंडर क्र. ३७४ द्वारे सामाजिक न्याय विभागाने काढलेल्या १,५०० कोटींच्या टेंडरमध्ये मोठा घोटाळा उघड झाला आहे. या टेंडरमध्ये अनियमितता आहे. या टेंडरसाठी स्मार्ट सर्व्हिसेस (पूर्वीची ब्रिस्क इंडिया), बीव्हीजी इंडिया आणि क्रीस्टल इंटीग्रेटेड सर्व्हिसेस फक्त याच तीन कंपन्या पात्र ठरल्या आहेत. या तिन्ही कंपन्यांनी १९.५० टक्के इतकाच सर्व्हिस चार्ज दिला आहे, म्हणजे स्पष्ट रिंग (Collusion) आहे. हे बेकायदेशीर असून पूर्वी ब्रिस्क इंडियाला ब्लॅकलिस्ट करा असे पत्र आपणच दिले होते.

या कंपनीवर ईडीची कारवाई सुरु आहे. या टेंडरमध्ये एकूण खर्चाचा उल्लेख नाही. यामध्ये सहा वर्षांसाठी ३,६३४ कामगार दाखवण्यात आले आहेत, पण कोणत्या पदासाठी किती वेतन दिले हेच दिलेले नाही. केवळ सर्व्हिस चार्जच्या आधारावर हजारो कोटी रुपयांचा निर्णय घेण्यात आला आहे. १३ वर्षे (२०१३) झाले हेच ठेकेदार आहेत, याचा एक पॅटर्न तयार झाला आहे. गेल्या १० वर्षांत कोणतेही नवीन टेंडर न काढता काम सुरू आहे. यात एकाच टेंडरवर १,५०० कोटींचे पेमेंट झाले आहे.

विजय कुंभार यांनी हा घोटाळा असल्याचा दावा करताना याची चौकशी करण्यासह इतरही काही मागण्या केल्या आहेत. त्यांनी म्हटले आहे की, हे १५०० कोटींचे टेंडर तात्काळ रद्द करण्यात यावे. रिंग करणाऱ्या कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. जिल्हानिहाय टेंडर प्रणाली लागू करुन त्यात स्थानिक महिला गट, युवक, संस्थांना संधी मिळावी. मागील १३ वर्षांचा गैरव्यवहार आणि विना-टेंडर काम याची देखील चौकशी करण्यात यावी. ही बाब सामाजिक न्याय विभागातील पारदर्शकतेचा आणि सार्वजनिक निधी वापरावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा आहे. कृपया मुख्यमंत्र्यांनी या घोटाळ्याकडे त्वरित लक्ष द्यावे आणि कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १५ जुलै २०२५


## अवैधरीत्या शस्त्रे बाळगणारे पाच जण पोलिसांच्या ताब्यात

**खुलताबाद (योगेश रावते) :** शहरातील बडके आली मोहल्ला, सईदानिमा मोहल्ला, गुलाबशहा कॉलनी, साळीवाडा, बाजारगल्ली, कुरेशी मोहल्ला, या परिसरातील सात जणांकडे घातकशस्त्रे असून त्याआधारे ते परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अत्यंत गोपनीय पध्दतीने परिसरात सापळा रचून घातकशस्त्रासह ताब्यात घेतले आहे.याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार, शहरातील सात जणांकडे घातकशस्त्रे असून त्याआधारे ते परिसरात दहशतीचे वातावरणनिर्माण करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने अत्यंत गोपनीय पध्दतीने परिसरात सापळा रचून मोहमंद अल्तमश मोहमंद फईम (वय २७ वर्षे रा. बडकेआली मोहल्ला), मोहमंद मुजाहिद निसार कुरेशी (वय २४, रा. बडकेआली मोहल्ला) फलक शहा नासेर शहा, (वय २२ रा. सईदानिमा मोहल्ला) यांनी त्यांचे राहते घराचे आजुबाजूच्या परिसरात धारधार शस्त्र तलवार तर फईजान शहा अब्दुल शहा (वय २६ रा. बाजारगल्ली साळीवाडा) याने धारधार कोयता शस्त्र लपवुन ठेवलेले पथकाला काढून दिले आहे. नमुद सर्व आरोपीवर पोलीस ठाणे खुलताबाद येथे कलम४, २७, भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील गुलाब शहा कॉलनी, पाण्याचे टाकीजवळ परिसरातील राहणारा अजमत खान अजीज खान हा विनापरवाना बेकायदेशीरपणे गावठी कट्टा बाळगून असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने त्याचे घराजवळ सापळा लावून त्यास शिताफीने ताब्यात घेऊन गावठी कट्टा बाबत विचारपूस केली असता त्यांने मंडप डेकोरेटरच्या सामानामध्ये लपवून ठेवलेला गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुस पथकाला काढून दिले आहे. त्याच्याविरूध्द पोलीस ठाणे खुलताबाद येथे कलम ३, २७, भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जय बाबाजी परिवाराच्या वतीने तिरुपती बालाजी लक्ष्मी कुबेर महायज्ञ

**खुलताबाद (योगेश रावते) :** निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी महाराज धर्म पीठाचे पिठाधीश्वर, अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी (मौनगिरीजी) महाराज यांच्या प्रेरणेने, पुण्यभूमी श्रीक्षेत्र तिरुपती बालाजी येथे १५ ते २२ जुलै २०२५ दरम्यान "ओम जगदगुरु जनशांती धर्मसोहळा" भव्य स्वरूपात संपन्न होणार असून या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.अनंत विभूषित जगदगुरु शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत आठवडाभर आयोजित या पर्वकाळात १०८ कुंडात्मक लक्ष्मी कुबेर महायज्ञ, महाजपानुष्ठान, अखंड नंदादीप, श्रमदान, सत्संग, प्रवचने, तसेच हस्तलिखित नामजप साधना यांसारखे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.दररोज ब्रह्ममुहूर्तावर पहाटे ५ वाजता नित्य नियम विधी , ध्यान, प्राणायाम, आरती, श्रीसार्थ एकनाथी भागवत वाचन यांसारख्या उपासना उपक्रमांमुळे वातावरणात भक्तिभावाची अनुभूती येणार आहे. जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने वार्षिक तीर्थ यात्रा अंतर्गत आजतागायत देशभरातील प्रमुख तीर्थक्षेत्रांवर विविध सोहळे यशस्वीरित्या संपन्न झाले आहेत. बद्रीनाथ, केदारनाथ, जगन्नाथपुरी, काशी, पंढरपूर,कामाख्या देवी यांसह देशभरातील विविध महत्वपूर्ण ठिकाणी याआधीही जपानुष्ठान, महायज्ञ,हस्तलिखित नामजप याबरोबरच श्रमदानाच्या माध्यमातून स्वच्छता मोहिम राबवण्यात आलेली आहे. श्रम प्रतिष्ठेचा संदेश देणाऱ्या या परंपरेला जगदगुरु शांतिगिरीजी महाराजांनी दीर्घकाळापासून प्रभावीपणे पुढे नेत आहेत. आजतागायत देशभरात ५० लाखांहून अधिक तासांचे श्रमदान यशस्वीरीत्या पार पडले असून, येत्या काळात तिरुपती येथे हजारो भक्तांच्या सहभागातून भव्य स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे या स्वच्छता मोहिमेमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या "श्रमेव जयते" या संकल्पनेलाही बळ मिळणार आहे.धर्मसोहळा नियोजन समिती व जय बाबाजी भक्तपरिवारने भाविकांना या पुण्य कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## आई

आयुष्याच्या हिरवळीचं गाव असते आई
मुक्या साऱ्या भावनांना ठाव असते आई

लेकरांच्या डोळ्यातली ओल असते आई
सागराच्या तळातली खोल असते आई

काळजात कोरलेली माय असते आई
रानावनात राबणारी गाय असते आई

भर उन्हात सावलीचं झाड असते आई
गोड नात्यात पारंब्याचं वड असते आई

भाकरीत मळलेलं पीठ असते आई
तव्यावर तळलेलं मीठ असते आई

चुलीमध्ये जळणारं सरपण असते आई
यज्ञकुंडात संसाराच्या अर्पण असते आई

काळजात लेकरांच्या गुंजत असते आई
कवितेच्या पानावर रूजत असते आई

गाथेसोबत ज्ञानेशाची ओवी असते आई
लेकरांच्या भल्यासाठी देवी असते आई

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
मो ९४०३३८४८८९


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १५ जुलै २०२५

# रघुनाथपूरवाडी येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



**वैजापूर :** जि. प. प्रा. शा. रघुनाथपुरवाडी, ता. वैजापूर येथे गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आईवडील, गुरुजन आणि थोरामोठ्यांप्रति विद्यार्थ्यांनी आदर व्यक्त करत प्रसंगानुरूप गीत गायन, मंत्रपठण, भाषण भेटकार्ड निर्मिती, वेशभूषा, रांगोळी इत्यादी कलांचे उत्साहाने सादरीकरण केले. विद्यार्थ्यांना मिठाई वाटून कार्यक्रमाचा समारोप झाला. याप्रसंगी शिक्षक संजय जाधव, महेश खोशे, सूर्यकांत फड, जी. बी. पवार आणि प्रतीक्षा राशिनकरसह पालक उपस्थित होते.

# कन्नड तालुक्यातील हतनूर येथे तिफण लेखक - वाचक मेळाव्याचे आयोजन

**कन्नड :** कन्नड तालुक्यात त्रैमासिक तिफण व भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड , अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्था, शाखा कन्नड , तिफण वाचक चळवळ यांच्या वतीने नव्या पिढीतील कवी - लेखकांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, वाङ्मयीन चळवळ गतिमान होवून वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी, उत्तमोत्तम लेखक - कवी घडावेत या महत्वपूर्ण उद्देशाने सातत्याने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमातून अनेक नवोदित कविंना व्यासपीठ मिळून ते सातत्याने लेखन करीत आहेत. मान्यवर साहित्यिका बरोबरच नव्या पिढीतील साहित्यिकांचा तिफण लेखक वाचक मेळावा कन्नड तालुक्यातील हतनूर येथे रविवार दि. ३ ऑगस्ट २०२५ रोजी तिफण लेखक वाचक मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात साहित्य व सांस्कृतिक चळवळीत कन्नड तालुक्याचे योगदान या विषयावर परिसंवाद होणार असून वाङ्मयीन चळवळीची पुढील दिशा यावर व्यापक विचार मंथन होणार आहे. तसेच ज्येष्ठ कवी व गीतकार, महाराष्ट्राचे रानकवी पदमश्री ना. धो.महानोर यांचे अजिंठ्याच्या कुशित पळसखेड येथे त्यांनी जीवन व्यतित केले. त्यांचे संवेदनशिल मन रानात रमले. तिथेच त्यांच्या सर्जनशिलतेला धुमारे फुटले. त्यांच्या कविता व गीतांनी मराठी रसिकावर गारूढ केले. या रानकविंना आदरांजली म्हणून त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ रानकविंना अभिवादन करण्यासाठी रानातल्या कविता या कविसंमेलनाचे आयोजन ही करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष बम्हगिरी गोस्वामी व प्रकाश शहरवाले हे असून हतनूर गाव शिवारातील प्रेमकमल या फार्म हाऊसवर साहित्यिकांचा मेळावा होणार आहे. या मेळाव्यात कन्नड तालुक्यातील साहित्यिकांनी सहभागी व्हावे , असे आवाहन तिफण लेखक - वाचक मेळाव्याचे संयोजक तथा तिफणचे संपादक डॉ. शिवाजी हुसे, तिफण लेखक वाचक चळवळ चे अध्यक्ष डॉ. दिलिप बिरुटे, राज्य समन्वयक डॉ. रामचंद्र झाडे, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे कन्नड तालुका शाखा अध्यक्ष प्रविण दाभाडे, सचिव अरुण थोरात, कार्याध्यक्ष संदीप ढाकणे, ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, का. का. थोरात, भीमराव सोनवणे, भरत सोनवणे, श्रीराम दापके, अनिता राठोड, प्रा. सूर्यकांत सांभाळकर, प्रा. रमेश वाघचौरे, प्रा. अशोक दुधकर, संदीप वाकडे, गीतांजली गजबे, शुभदा देवरे, अमोल मोकासे, कवी शिवनाथ गायकवाड ,अजय दवंडे, आर्दीनी केले आहे.

# शिक्षकाचा मान हा समाजाचा मान - एक विचारप्रवर्तक लेख

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षक म्हणजे केवळ एक विषय शिकवणारा व्यक्ती नसतो, तर तो एक समाजघटक घडवणारा शिल्पकार असतो. "शिक्षकाचा मान हा समाजाचा मान" ही केवळ एक सुंदर घोषणा नाही, तर ती समाजाच्या संस्कृतीची आणि प्रगतीची दिशा दर्शवणारी खरीखुरी संकल्पना आहे. शिक्षकाचा आदर करणे हे प्रत्येक जबाबदार नागरिकाचे कर्तव्य आहे. कारण शिक्षक नसेल तर डॉक्टर, अभियंता, शास्त्रज्ञ, अधिकारी, नेता यांचं अस्तित्वच शक्य होणार नाही. शिक्षक समाजाच्या रचनेचा कणा असतो.◈ शिक्षक म्हणजे ज्ञानाचा दीपस्तंभशिक्षक आपल्या विद्यार्थ्यांच्या आयुष्यात एक अशी मशाल असतो, जी अज्ञानाचं अंधार दूर करत जीवन उजळवतो. आपल्या देशाच्या अनेक थोर व्यक्तींनी त्यांच्या यशाचं श्रेय त्यांच्या शिक्षकांना दिलं आहे. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचं उदाहरण घ्यावं — त्यांनी त्यांचे शालेय शिक्षक श्रीवास्तव सर यांचा नेहमी आदरपूर्वक उल्लेख केला आहे. यावरूनच शिक्षकाची भूमिका किती प्रभावी आणि मोलाची आहे हे लक्षात येतं.◈ शिक्षकाचं कार्य — पिढ्या घडवणंशिक्षक हा केवळ शाळेचा कर्मचारी नसतो. तो समाजाच्या उभारणीत सक्रिय योगदान देणारा विचारवंत असतो. शाळा किंवा महाविद्यालय हे ज्ञानदानाचं मंदिर असतं, आणि शिक्षक त्यात पूज्य पुजारीसारखा असतो. तो केवळ गणित, विज्ञान, इतिहास शिकवत नाही, तर तो माणूस घडवतो — मूल्यं देतो, शिस्त शिकवतो, आत्मविश्वास निर्माण करतो.आज आपण जे काही आहोत ते आपल्या शिक्षकांच्या संस्कारामुळे आणि मार्गदर्शनामुळेच. त्यामुळे शिक्षकाचा सन्मान करणं म्हणजे आपल्या मूळांचा सन्मान करणं होय.◈ समाजात शिक्षकाचा घटलेला सन्मान — चिंतेचा विषयपूर्वी शिक्षकांना समाजात 'गुरु' या शब्दाने संबोधलं जायचं. गुरू म्हणजे अंधार दूर करणारा. समाज त्यांना डोक्यावर घेत असे. मात्र आजच्या काळात समाजात शिक्षकांचा सन्मान कमी झाल्याचं चित्र दिसतं. अनेक ठिकाणी शिक्षकांना केवळ सरकारी नोकर म्हणून पाहिलं जातं. त्यांच्या कार्याचं महत्त्व न समजता त्यांच्याकडून अतिरिक्त अशैक्षणिक कामं करून घेतली जातात — जसे की मतदार यादी, जनगणना, सर्वेक्षण, सरकारी कार्यक्रमांचं आयोजन वगैरे. या कामांमुळे शिक्षक मूलभूत शिक्षणावर लक्ष देऊ शकत नाहीत.विद्यार्थी, पालक आणि समाज यांच्यातही शिक्षकांविषयी आदराची भावना काही अंशी कमी झाल्याचं जाणवतं. विद्यार्थ्यांचा शिस्तीचा अभाव, पालकांचा गैरसमज, आणि सोशल मीडियावर शिक्षकांविषयी अपमानास्पद पोस्ट्स — हे सर्व बदललेलं वास्तव आहे.◈ शिक्षकांचा सन्मान का आवश्यक आहे?1. भविष्याची पायाभरणी — शिक्षक हे देशाच्या भविष्याच्या पाया रचतात. जर त्यांचाच सन्मान केला गेला नाही तर तरुण पिढी काय शिकेल?2. मूल्याधारित शिक्षणासाठी प्रेरणा — जेव्हा शिक्षकांचा समाजात आदर केला जातो, तेव्हा शिक्षकही प्रेरित होऊन अधिक उत्साहाने शिकवतात. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळतं.3. नवीन शिक्षकांना आकर्षित करणं — शिक्षक व्यवसाय जर सन्माननीय राहिला, तर बुद्धिमान आणि समर्पित तरुणही या व्यवसायात येतील.4. सामाजिक समृद्धीसाठी आधारस्तंभ — एक सुशिक्षित समाज घडवण्यासाठी शिक्षकांचा आदर करणे आवश्यक आहे. समाजाच्या एकूण प्रगतीचा पाया हे गुणवत्तापूर्ण शिक्षणच असतं.◈ शिक्षकांचे आजचे वास्तवआज बहुतांश शिक्षक शिक्षणाशिवाय इतर कामात अडकले आहेत. शासन त्यांच्यावर अनेक प्रकारचं काम लादतं — मतदान, जनगणना, पोषण आहाराचे रेकॉर्ड, विविध योजना, प्रशिक्षण इत्यादी. त्यामुळे शिक्षक शिक्षणापासून दूर जातो. याशिवाय अनेक शाळांमध्ये शिक्षकांची संख्या अपुरी आहे. एका शिक्षकाला अनेक विषय शिकवावे लागतात.त्यामुळे समाज आणि सरकार यांनी शिक्षकांच्या कामकाजाची व्याप्ती पुन्हा समजून घ्यायला हवी आणि त्यांना शिक्षणाच्या मूळ भूमिकेत ठेवायला हवं.◈ आदर्श शिक्षक आणि प्रेरणादायक उदाहरणेइतिहासात अनेक शिक्षक झाले ज्यांनी समाजाला दिशा दिली:डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन — ज्यांच्या जन्मदिनी शिक्षक दिन साजरा केला जातो, त्यांनी शिकवणं हे एक दैवी कार्य मानलं.सावित्रीबाई फुले — भारतातील पहिल्या शिक्षिका. स्त्रियांसाठी शिक्षणाची मशाल घेऊन त्या अंधारात उतरल्या.डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम — एक शास्त्रज्ञ आणि राष्ट्रपती असूनही ते स्वतःला "शिक्षक" म्हणवून घ्यायला प्राधान्य देत.हे सर्व आदर्श आपल्याला सांगतात की शिक्षक हे बदल घडवतात — समाजात, मनात आणि संस्कृतीत.◈ शिक्षक सन्मानाचे मार्गशिक्षकांचा सन्मान करण्याचे अनेक मार्ग आहेत:1. शाळांमध्ये शिक्षकांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा देणे.2. पालकांनी शिक्षकांशी सुसंवाद ठेवणे आणि त्यांचा आदर करणे.3. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे बोलणे, शिकवणे गांभीर्याने घेणे.4. सरकारने शिक्षकांसाठी वेगळा आदरपूर्ण धोरणात्मक दृष्टिकोन ठेवणे.5. माध्यमांमध्ये शिक्षकांचे सकारात्मक योगदान दाखवणे.◈ "गुरु" संस्कृतीचा पुनरुज्जीवनभारतीय परंपरेत "गुरु शिष्य परंपरा" ही पवित्र मानली गेली आहे. गुरु ही संकल्पना केवळ पुस्तकी ज्ञान देणाऱ्या व्यक्तीपुरती मर्यादित नव्हती. ती जीवनाचे ज्ञान, मूल्य, शिस्त, संयम आणि समर्पण शिकवणारी होती. आज त्या परंपरेला आधुनिक संदर्भात नव्याने जागृत करण्याची गरज आहे. शिक्षकांवर पुन्हा तोच विश्वास निर्माण करायला हवा.◈ शिक्षकांचा मान म्हणजे समाजाची उन्नतीशिक्षक हा समाज घडवतो, संस्कृती जपतो, विचार निर्माण करतो, राष्ट्र घडवतो. त्यामुळे "शिक्षकाचा मान हा समाजाचा मान आहे" ही घोषणा केवळ भाषणापुरती न राहता ती आचरणात आणली गेली पाहिजे. शिक्षकांचा सन्मान केल्याशिवाय समाज प्रगत, समृद्ध आणि सुसंस्कृत होऊ शकत नाही.आज शिक्षण हे भविष्यातील सर्वात मोठं शस्त्र आहे, आणि शिक्षक हा त्या शस्त्राचा धारक. त्याच्या हातात विद्यार्थ्यांचं, कुटुंबाचं आणि अखेर समाजाचं भविष्य आहे.म्हणून आपण सर्वांनी — पालक, विद्यार्थी, प्रशासक आणि सामान्य नागरिक — मिळून ठरवायला हवं की आपण आपल्या शिक्षकांचा सन्मान करू, त्यांना आदर देऊ, आणि त्यांना त्यांच्या खऱ्या कार्यात मुक्तपणे योगदान द्यायला प्रेरणा देऊ. याचं फळ म्हणजे सशक्त, सुसंस्कृत आणि समृद्ध समाज.---

**लेखक**
**डॉ. जाहेदखान साहेबखान पठाण**
महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर
मो. 92718 41219

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १५ जुलै २०२५


## तिफण लेखक - वाचक मेळावा अध्यक्षपदी के. एस. अतकरे यांची निवड



**कन्नड :** छत्रपती संभाजीनगरग्रामीण भागात वाचन संस्कृती वृद्धिंगत होवून नवोदित लेखक - कवी घडावेत या उद्देशाने सातत्याने त्रैमासिक तिफण , तिफण वाचक चळवळ , भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड आणि अ.भा. मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे शाखा कन्नड च्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून येत्या ३ ऑगस्ट रविवार रोजी कन्नड तालुक्यातील हतनूर येथील प्रेमकमल फार्म हाऊसवर तिफण लेखक - वाचक मेळावा आयोजित करण्यात आला आहे. तिफण लेखक - वाचक मेळाव्याच्या अध्यक्षपदी प्रकाशक के. एस. अतकरे यांची निवड करण्यात आली आहे. कन्नड सारख्या ग्रामीण भागात पहिल्यांदाच असा मेळावा होत असून तालुक्यातील साहित्यिकासह विविध मान्यवर यामध्ये सहभागी होणार आहेत. या मेळाव्यात आजच्या लेखका पुढील आव्हाने, या विषयावर परिसंवाद तर वाचन संस्कृतीच्या संवर्धनात साहित्यिकांची भूमिका या विषयावर परिचर्चा होणार आहे. कविवर्य ना.धो.महानोर स्मृति अभिवादन कविसंमेलन रानातल्या कविता आयोजित करण्यात आले आहे. लेखक व वाचक यांच्यात सुसंवाद घडावा , साहित्यिक चळवळ गतिमान होवून नवे लेखक वाचक घडावे, व्यापक विचार मंथन व्हावे हा या मेळाव्याचा प्रमुख उद्देश आहे. के. एस. अतकरे हे कैलास पब्लिकेशन्स छत्रपती संभाजीनगरचे संचालक असून मराठवाडा साहित्य परिषदेचे माजी कार्यवाह व विद्यमान सदस्य आहेत. कैलास पब्लिकेशन्सच्या माध्यमातून त्यांनी अनेक लेखकांची पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. युवा साहित्य संमेलने भरवून त्यांनी वाङ्मयीन चळवळीला हातभार लावला आहे. अ.भा. मराठी प्रकाशक संघाचे अध्यक्षस्थान ही त्यांनी भूषविले आहे. मराठी साहित्य : समाज संस्कृतीची परिक्रमा या पुस्तकाचे संपादनही त्यांनी केले आहे. या तिफण लेखक -वाचक मेळाव्यात साहित्यिकांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन संयोजक डॉ. शिवाजी हुसे, संशोधन परिषदेचे शाखाध्यक्ष प्रविण दाभाडे, सचिव अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, संदीप ढाकणे ,लक्ष्मण वाल्डे प्रा. सूर्यकांत सांभाळकर, प्रा. रमेश वाघचौरे,श्रीराम दापके ,संदीप वाकडे, का . का. थोरात, भीमराव सोनवणे, भरत सोनवणे, अनिता राठोड, शुभदा देवरे, गितांजली गजबे, सुरेश आवटे, शिवनाथ गायकवाड, अमोल मोकासे आणि स्वागताध्यक्ष व निमंत्रक ब्रम्हगिरी गोस्वामी , प्रकाश शहरवाले यांनी केले आहे.

## सर्पमित्र ने दोन नागाला दिले जीवदान



**दौलताबाद (जावेद अहमद) :** माळीवाडा येथे येथे दि १४ सोमवार रोजी अतुल हेकडे यांच्या घरात भला मोठा इंडिया जातीचा क्रोब्रा नाग आढळून आला. याची माहिती हेकडे कुटूबियानी माळीवाडा येथील सर्पमित्र कमलाकर गुमणार यांना फोन करून दिली. माहिती मिळताच सर्पमित्रांनी घटनास्थळी जाऊन पाच फूट लांब व चार ते पाच किलो वजनाच्या नागाला पकडले. त्यानंतर त्याला निसर्गाच्या अधिवासात सोडून जीवदान देण्यात आले. तसेच दिनांक १४ सोमवारी फतियाबाद ता.गंगापुर येथील शेतकरी अशोक जाधव यांच्या शेतावरील वस्तीवर भला मोठा कोब्रा नाग निघाल्याची अशी माहिती मिळाली.सर्पमित्र कमलाकर गुमणार तातडीने जाऊन पाच फुटी विशारी नागाला पकडून निसर्गाच्या अधिवासात सोडुन जिवदान दिले.

## मुरूमचे माजी नगराध्यक्ष श्री.जे.टी. लिमये गुरुजी स्मृतीदिनानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील मुरूम शहराचे माजी नगराध्यक्ष जे.टी.लिमये गुरुजी यांच्या चौथ्या स्मृतीदिनानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि पोषक आहाराचे वाटप करण्यात आले.उमरगा जनता बँकेचे चेअरमन आणि भाजपचे युवा नेते शरण बसवराज पाटील यांच्या हस्ते या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.मुरूम शहरातील जिल्हा परिषद स्पेशल शाळेत हा शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम पार पडला.जवळपास 150 विद्यार्थ्यांना या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्याते आले.या कार्यक्रमाच अध्यक्षस्थान प्रमोद कुलकर्णी यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून शरण बसवराज पाटील हे उपस्थित होते.याप्रसंगी श्री.जगन्नाथ गोशाळा च्या पोस्टरचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी स्मृतिशेष जे.टी.लिमये गुरुजी यांच्या आठवणींना विचारपीठावरील उपस्थित मान्यवरांनी उजाळा दिला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक निर्मलकुमार लिमये यांनी केलं तर शरण पाटील,प्रमोद कुलकर्णी,धम्मचारी धम्मभूषण आणि विश्वभूषण लिमये यांनी आपलं मनोगत यावेळी व्यक्त केलं.या कार्यक्रमाचे आभार आनंदकुमार कांबळे यांनी व्यक्ती केलं तर सूत्रसंचालन ख्याडे सरांनी केलं. या कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका प्रमिला तुपेरे, सुनीता मिरगळे, मंगल कचले, शिवाजी गायकवाड, रुपचंद गायकवाड, सी.एल. गोडबोले, अवेज ढोबळे, अमर भोसले, बाबा शिकलगर, अण्णाराव कांबळे, राहुल गायकवाड, प्रशांत मुरूमकर, राजू मुल्ला अमोल गोडबोले उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ सुदर्शन कदम, समीर सोमवंशी, पार्थ कदम, विशाल सोनवणे, अभिषेक कांबळे प्रयत्न केले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १५ जुलै २०२५


## आंतरराष्ट्रीय कौशल्य दिनाच्या निमित्ताने १५ जुलै रोजी मेगा जॉब फेअर




**जालना :** दि. १५ जुलै रोजी बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कौशल्य दिनाच्या निमित्ताने विविध नोकर भरतीसाठी विविध प्रतिष्ठाने सहभागी होणार असून अभिनव इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, ठाणे आणि आघाडीच्या उद्योगांच्या सहकार्याने, आंतरराष्ट्रीय युवा कौशल्य दिनानिमित्त एक मेगा जॉब फेअर आयोजित करत आहे. या जॉब फेअरचे उद्घाटन जिल्हाधिकारी मा. श्रीकृष्ण पांचाळ आणि श्री. गणेश चिमणकर, सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता यांच्या हस्ते होणार असून यावेळी श्री.राजेंद्रजी बारवाले, डॉ.उषा झेर, श्री. अरुणजी अग्रवाल, श्री. सुरेशजी अग्रवाल, सविता बगडिया यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.पदवीच्या अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी, पदवीधरांसाठी आणि नोकरी शोधणाऱ्यांसाठी ही महत्त्वाची संधी असून करिअर यशाच्या दिशेने पहिले पाऊल आहे. १५ जुलै २०२५ (मंगळवार) वेळ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत या संधीचा फायदा घेता येईल.आयटी, बीएफएसआय, आरोग्यसेवा, लॉजिस्टिक्स, रिटेल, फार्मा, मॅन्युफॅक्चरिंग, स्टील, कृषी, अभियांत्रिकी आणि इतर क्षेत्रातील ३० पेक्षा अधिक नामांकित कंपन्या यात सहभागी होणार आहेत. यावेळी प्रत्यक्ष जागेवर मुलाखती आणि नोकरीच्या ऑफर तसेच नियोक्त्यांशी संवाद साधण्याची आणि उद्योगांच्या अपेक्षा समजून घेण्याची सर्व उमेदवारांसाठी पूर्णपणे मोफत संधी यानिमित्ताने उपलब्ध झाली आहे. याकरिता पुढील लिंकवर नोंदणी करावी : https://bit.ly/CandidateReg2025JF ही लिंक वापरून नोंदणी करावी आणि आपल्या अपडेट केलेल्या बायोडाटासह नियोजित दिवशी उपस्थित रहावे. लिंकवर नोंदणी केल्यानंतर तुम्हाला यासंदर्भात अधिक माहिती मिळेल. याबाबत अधिक माहितीसाठी 8976911277 वर संपर्क साधावा. असे आवाहन यानिमित्ताने प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांची अडचण दुर-भुयार चिंचोली मार्गे बस सेवा पूर्ववत चालु




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** धाराशिव जिल्ह्यातील उमरगा आगारात नवीन आलेल्या 5 बसेस पैकी एका बसेसचे पूजन प्रतिभा निकेतन माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय मुरूम यांच्या विनंतीला मान देऊन उमरगा आगारप्रमुख प्रसाद कुलकर्णी, वाहतूक निरिक्षक अभिमन्यू सरवदे व प्राचार्य उल्हास घुरघुरे यांच्या मार्गदर्शनाखाली उमरगा भुयार चिंचोली मार्गे मुरूम बस सेवा पूर्ववत चालू करण्यात आली.प्रा.गिरी संजय यांच्या हस्ते नवीन लाल परीचे मुरूम येथे पूजन करण्यात व मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आला. याप्रसंगी मुरूम बस स्थानक प्रमुख अमरसिंग रजपूत, प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक मुरूम विद्यालयातील प्रा.अण्णाराव कांबळे , सोलंकर नारायण, प्रा.अजित सूर्यवंशी प्रा.अमोल गायकवाड, प्रा, दीपक सांगळे, प्रा. राघवेंद्र धर्माधिकारी, फिरोज कागदी,राजू कोळी, माजी वाहक मुदखणा सुरेश,विद्यार्थिनी माही, महेश चव्हाण व वैष्णवी संजय जाधव पत्रकार महेश निंबरगे,पत्रकार रामलिंग पुराणे,तसेच मुरूम येथील नागरिकांचाही मोठ्या संख्येने सहभाग होता. उमरगा आगारातील कर्तव्य बजावत असलेले चालक सिद्धू बंदीछोडे व वाहक सतीश सूर्यवंशी यांचे गुलाबाचे फुल देऊन स्वागत केले.

## मी छत्रपतींच्या गादीचा खरा वारसदार : अभिजीत बिचुकलेंचा अजब दावा



**मुंबई :** महाराष्ट्रात सध्या भाषेवरून चांगलाच वाद पेटला आहे. हिंदी सक्तीला केलेल्या विरोधानंतर राज्य सरकारने दोन्ही शासन निर्णय रद्द केले. त्यानंतर महाराष्ट्रात हिंदी विरुद्ध मराठी भाषा असा वाद पाहायला मिळत आहे. यावर अनेकांनी विविध प्रतिक्रिया देत आपापली पोळी भाजून घेतली आहे. आता बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. तसेच छत्रपतींच्या गादीचा खरा वारसदार आपण असल्याचा अजब दावा देखील त्यांनी केला आहे.

एका मुलाखतीत अभिजीत बिचुकलेंना मराठी आणि हिंदी भाषेच्या वादावर प्रश्न विचारण्यात आला होता. भाषेच्या सक्तीबाबत तुम्ही कोणाच्या बाजूने आहात? असे त्यांना विचारण्यात आले. त्यावर ते म्हणाले, कोणीही फक्त पब्लिसिटीसाठी काहीही करू नये. महाराष्ट्रासाठी उद्याचा नेता फक्त आणि फक्त अभिजीत बिचुकलेच आहे. सगळ्यांची वय, त्यांचे कारनामे, कटकारस्थान बघा. आजपर्यंत दारू आणि मटणावर अनेकांच्या निवडणुका झाल्या. आधी काँग्रेस होती, मग भाजप आली आणि त्यानंतर अभिजीत बिचुकलेच असणार आहे. त्यामुळे तुम्हाला माझ्यासोबत यावे लागेल, मी कोणासोबत जाणार नाही.

पुढे बोलताना अभिजीत बिचुकले म्हणाले, मी शिवरायांचा वैचारिक माणूस आहे, त्यामुळे राजगादीबरोबर तुम्हाला सगळ्यांना माझ्याकडेच यावं लागेल. आजपर्यंत तुम्ही राजगादीचा गैरवापर केला, छत्रपतींच्या नावाचा गैरवापर केला. आता त्यांचा खरा वारसदार आला आहे... अभिजीत बिचुकले!, असा दावा त्यांनी केला आहे. तसेच उदयनराजे शांत आणि सभ्य असतील, पण मी त्यांच्यापेक्षाही सभ्य आहे. पण छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा गैरवापर इथून पुढे मी कोणालाही करू देणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांची गादी माझी आहे!, असा अजब दावा अभिजीत बिचुकले यांनी केला आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनसचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com